<u>प्रेस नोट</u>

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ३०.०६.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ . | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | डॉ.मुरलीधर प्रभाकर वाडेकर, वय ४६ वर्ष, पद – सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग अमरावती, रा.विद्युत नगर बगीच्या जवळ अमरावती ता.जि.अमरावती वर्ग – १ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ३०/०६/२०२२ चे १५.११ ते १५.४५ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ३०,०००/– रुपये |
| ७ | घटनास्थळ | सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग अमरावती यांचे कार्यालयातील दालन |

**थोडक्यात हकिकत :** यातील तक्रारदार यांनी दिनांक २९/०६/२०२२ रोजी डॉ. मुरलीधर वाडेकर, सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, अमरावती विभाग हे तक्रारदार यांची मुलाखत झालेनंतर त्यांचे 'सहयोगी प्राध्यापक' या पदासाठी वेतननिश्चिती, सर्विस बुकवर नोंद व 'सहयोगी प्राध्यापक या पदासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ३००००/–रु. लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.२९/०६/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान डॉ. मुरलीधर वाडेकर, सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, अमरावती विभाग यांनी 'सहयोगी प्राध्यापक' या पदासाठी वेतननिश्चिती, सर्विस बुकवर नोंद व 'सहयोगी प्राध्यापक या पदासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ३००००/–रु. लाचेची मागणी लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक ३०/०६/२०२२ आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे डॉ. मुरलीधर वाडेकर, सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, अमरावती विभाग यांनी पंचासमक्ष ३०,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आरोपीला रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती, पो.नि.सतीश उमरे, पो.ना.युवराज राठोड, पो.कॉ.शैलेश कडू यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क :** अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१
टोल फ्रि नंबर – १०६४

पोलीस उपअधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

(सतीश उमरे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.न.७०२०६९३४८१

Scanned with CamScanner